महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


**क्रमांक :२२५३/मगकसे-संयुक्त(पूर्व)/उ.ता./२०२२/१६** **दिनांक :-** ०७ नोव्हेंबर, २०२२

## - घोषणा -

**विषय :- " महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२२ "** या स्पर्धा परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२२** रोजी आयोजित "**महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२२**" [लिपिक-टंकलेखक, दुय्यम निरीक्षक (राज्य उत्पादन शुल्क), कर सहायक, तांत्रिक सहायक (विमा संचालनालय) व उद्योग निरीक्षक (उद्योग संचालनालय), गट-क] या स्पर्धा परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकेच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

2. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व १ जुलै, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

३. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/ पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

५. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव

ठिकाण : मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई